जा.क्र.वि.शा./निवडणुक कक्ष/१३३९३/२०२४
पोलीस उप आयुक्त, वि.शा. कार्यालय,पुणे
दिनांक :- १६/११/२०२४

विषय :- **भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बी.एन.एस.एस.) २०२३ चे कलम १६३ प्रमाणे मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मोबाईल फोन घेवुन न जाणेबाबत.**

आदेश,

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांचे मुख्य निवडणुक अधिकारी, भारत सरकार यांचे प्रेसनोट क्र. ECI/PN/149/2024 DATE 15.10.2024 अन्वये महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. आचारसंहीता दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील. महाराष्ट्रातील सर्व विधानसभा मतदार संघात मतदान दिनांक २०/११/२०२४ रोजी होणार आहे.

पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात १९८ शिरुर, २०२ पुरंदर, २०३ भोर, २०८ वडगावशेरी, २०९ शिवाजीनगर, २१० कोथरुड, २११ खडकवासला, २१२ पर्वती, २१३ हडपसर, २१४ पुणे कॅन्टोंमेंन्ट व २१५ कसबा पेठ या विधानसभा मतदार संघाचा समावेश आहे.

निवडणूक आयोग, भारत सरकार यांचेकडून प्रसिध्द करण्यात आलेल्या नियमावलीप्रमाणे मतदानाच्या दिवशी मतदार हे मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मोबाईल फोन घेवुन न जाणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडणेसाठी, सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, मतदान केंद्राच्या परिसरात प्रचार होवु नये तसेच कायदा व सुव्यस्था अबाधित राखणेसाठी मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मोबाईल फोन घेवुन जाणेस प्रतिबंध करणे जरुरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी रंजन कुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बी.एन.एस.एस.) २०२३ चे कलम १६३ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ साठी पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व मतदान केंद्रावर दि. २०/११/२०२४ रोजी ००.०१ वा. पासून २४.०० वा पर्यत खालील आदेश देण्यात येत आहे.

- महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मोबाईल फोन घेवुन जाण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.
- मतदान केंद्रात अथवा १०० मीटर परिसरात कोणत्याही प्रकारे फोटोग्राफी/ व्हिडीओग्राफी करण्यास मनाई करण्यात येत आहे.
- मतदान केंद्र व मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरामध्ये कोणत्याही प्रकारचा ज्वलनशील पदार्थ, प्रतिबंधक वस्तु, आदर्श निवडणूक आचारसंहितेमध्ये नमुद केलेल्या नियमातील तरतुदीनुसार प्रतिबंधित बाबी घेवून जाण्यास मनाई करणेत येत आहे.

- उपरोक्त आदेश उमेदवार, उमेदवारांचे प्रतिनिधी व मतदार यांना लागु राहील.
- उपरोक्त आदेश मतदानासाठी नियुक्त केलेले शासकीय अधिकारी/ स्टाफ /पोलीस यांना लागू राहणार नाहीत.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय न्याय संहिता कलम २२३ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दि.१६/११/२०२४ रोजी दिला आहे.

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :१६/११/२०२४

(रंजन कुमार शर्मा)
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर